(இ-ள்) விலாப்பக்கங்களிலும் தேகத்திலும், காங்கை உண்டாகும். கண்கள், நாக்கு முதலான உறுப்புக்கள் வெளுத்துப்போம். உட்கொண்டவாகாரம் சீரணியாது. இவை கபத்திலுண்டாகும் மாகிகச்சுரத்தின் குறிகள் என்று அறியவும்.

சிலேத்ம மோகச் சுரத்தின் குறிகள்

அங்கமே குளிருங் காயு மடிக்கடி வியர்க்குஞ் சேற்பந்
தங்கிய மார்படைக்குஞ் சஞ்சல மிகவுண்டாகுஞ்
செங்கைகால் பொருத்துத் தோறுஞ் சீதமாய்க் குளிர்ந்து காணுந்
துங்கவேல் விழியாய்! சிலேற்ப மோகமாஞ் சுரமிதென்னே. (57)

(இ-ள்) கை கால்களில் அடிக்கடிக் குளிர்ச்சியும், சூடும் மாறி மாறி ஏற்படும். வியர்வையும் காணும். மார்பில் கபம் கட்டும். மூச்சு முட்டிச் சங்கடத்தைத் தரும். கை, கால், மூட்டுகள் இவைகளும் சில்லிட்டுப்போம். இவை "கபமோகச் சுர"த்தின் குறிகளாகும்.

கபச் சுரத்தில் வேறு குறிகள்

அல்லும் பகலும் வயிறாதி யருதே யன்ன மலத்தில் விழும்
நல்ல உடம்பு வெளுவெளுக்கும் நாக்கும் நீறி வழுவழுக்கும்
புல்லுஞ் சீத மலந்தன்னிற் பொருந்தி வீழு மிகநாறுஞ்
சொல்லுஞ் சிலேற்ப விகுதியினிற் சுரமென்றோது தோகையரே (58)

(இ-ள்) பகலிலும் இரவிலும் வயிறு ஊதிப்போய், சாப்பிட்ட ஆகாரம் சீரணிக்காமல் அப்படியே மலத்தில் போம். உடம்புவெளுத்துப்போம். நாக்கில் வெளுப்பு அதிகரித்து வழுவழுப்பாகும். மலத்துடன் சீதம் விழும். நாற்றமெடுக்கும். இவைகளும் கபச்சுரத்தின் குறிகளாகும்.

வாத சுரத்தின் குறிகள்

வாதசுரம் குளிர் நடுக்கல் தலைச்சுழற்றல்
வாய்துவர்த்த லிருமலுடன் குளிர்ந்து கூசல்
தாதுநிகழ் சந்திகள்தோள் பட்டைசென்னி
சர்வாங்க முழுமையே வல்குல்நோகப்
போதமலஞ் சலஞ்சிறுத்துக் கழிதல்மானே
பொருந்துமிது வாதசுர மறுநாள்தோஷ
மீதுகளித் தறிவுணர்ந்தோர் மருந்துசெய்தா
லிதமாகு மெனமுனிவ னியம்புவாரே. (59)

(இ-ள்) உடலில் குளிர், நடுக்கல், தலைச்சுற்றல், வாயில் துவர்ப்புச்சுவை, இருமல், தேகத்தில் சிலுசிலுப்பு, மூட்டுகள் தோள்பட்டை, தலை உடல், மர்மஸ்தானங்கள் முதலான இடங்களில் தாங்கமுடியாத வலி உண்டாகும், மலம், மூத்திரம் முதலியவைகள் குறைவடைதல் முதலான குறிகள் காணும். ஒருநாள் தோஷங்கள் பக்குவமடைந்த பின்னர் மறுநாள் மருந்து கொடுக்கவும்.

பித்தச்சுரக் குறிகள்

பித்தச்சுரங் கஞ்சித்தண்ணீர் வெறுத்தல்வார்த்தை
பிதற்றல் துண்ட மூடுலர்தல் தாகந்தாப
மெத்தவழ ரிக்கையுடன் மூர்ச்சைநாவு
மிகவுலர்தல் மிகக் காய்தல் கசப்புத்தோன்றல்
சித்தமுறக் குளிர்த்தியேயி ருமல்மஞ்சள்
செய்கையென வரோசித்தல் நகங்கண்காந்தல்
இத்தனையுஞ் செய்யிலிது பித்தமாகு
மெழுநாளுங் கழித்துமருந் தியல்பாய்ச் செய்யே. (60)

(இ-ள்) கஞ்சிபோன்ற ஆகாராதிகள் வெறுப்பு, வாய்க்கு வந்தபடி பிதற்றல், நாவறட்சி, தேகத்தில் காங்கை, மயக்கம், நாக்கு உலர்ந்துபோதல், நாக்கில் கசப்புச் சுவை, குத்திருமல், கோழை மஞ்சள் நிறத்துடன் வெளிவரல், ருசியின்மை, நகங்கள், கண்கள் முதலானவிடங்களில் எரிச்சல் முதலான குறிகளும் காணப்பட்டால் அது பித்தஜ்வரக் குறிகளாகும்.

இதற்கு ஏழுநாள் சென்றபின் மருந்துகள் கொடுக்கவும். அதாவது தோஷங்கள் பக்குவமடைய அவ்வளவு நாட்கள் செல்லும்.

கபச்சுரக் குறிகள்

சிலேத்மசுர மிருமல்சளி கொண்டதென்னத்
தியங்கவரோ சிகம்வாய்தித் தித்தலாகுஞ்

சொல்பெரிய மூர்ச்சைவாய் பேசா துற்றல்
சொல்லியவாய் நீரொழுகி வெளுத்தல் தேக
மலத்தினிடை வாய்வுறுதல் குடலில்தங்கி
வலித்திடுதல் வியாதியுடல் வலிக்குங்குத்துஞ்
செலுத்துவமை யெனத்தூங்கல் தசநாள் சென்றால்
சிகித்ஸையா முண்மைசொன் னோ மிருபத்தேழே. (61)

(இ-ள்) இருமல், தொண்டையில் சளி, சாப்பிட்டவாகாரம் செரியாமை, ருசியின்மை, வாயில் தித்திப்புச் சுவை, மயக்கம், பேசவியலாமை, வாயிலிருந்து நீரொழுகல், தேகம் வெளுத்துப்போதல், மலம் போகையில் வாயுப்பறிதல் அல்லது குடலில் தங்கி வலியையேற்படுத்தல், அதிகமான தூக்கம் முதலான குறிகள் காணும். 10 நாட்கள் சென்ற பின்னர் மருந்துகள் கொடுக்கவும்.

வாதபித்தச் சுரக் குறிகள்

வாதபித்தச் சுரமூர்ச்சை வாய்கெந்தித்தல்
வயிறிழிதல் வாந்திசெய்தல் மயிர்சிலிர்த்தல்
காதலுறு சுரமுமில்லை யுண்டோவென்னக்
கசந்துவா யருவருத்தல் சரீரம் நோகல்
போகமுறு தாகதம்ப மாகுமாகிற்
பொற்கொடியே வாதபித்தம் பொருந்திவந்த
தீதுசுரம் பதிமூன்று நாளுந்தோஷ
மிதுகழித்தால் மருந்துசெய்ய வியம்பினோமே. (62)

(இ-ள்) மயக்கம், வாயில் துற்நாற்றம் வீசல், வயிறு பேதி, தீராத வாந்தி, மயிர்க்கூச்சலேற்படுதல், சுரம் லேசாக அடித்தல், வாயில் கசப்புச்சுவை, அருவருப்பு உடம்புவலி, அதிகமான நாவறட்சி, இவை " வாதபித்தச் " சுரக் குறிகளாகும். 13 நாட்கள் சென்றபின் மருந்துகள் கொடுக்கவும்.

வாத கபச்சுரத்தின் குறிகள்

வாதசிலேற் பனசுரத்திற் புலம்பலுண்டாம்
வாதமுண்டா முடல்நோகத் தேகம்வீங்கச்
சாதுரிய மான தொண்டைக் கட்டுநாசி
தன்னிலே நீரொழுக லிளைப்புண்டாகப்
பேதமுற விருமலெழ வாயினிக்கப்
பெரு வெய்யிலு மனலுமிக விரும்பக்காய
ஆதரவாய் மலஞ்சலமும் வெளுக்குமாகில்
... ... சிலேற் பனசுரமென் றறியலாமே. (63)

(இ-ள்) தன்னையறியாமல் புலம்பல், வாயு தேகத்தில் அதிகரித்தல், உடம்பில் வலி, வீக்கம், தொண்டைக்கட்டு, மூக்கிலிருந்து நீர் ஒழுகல், மூச்சுத் திணறல், இருமல், வாயில் தித்திப்புச்சுவை, வெய்யில், அனல் இவைகளில் விருப்பம், மலம், மூத்திரம், இவை வெளுத்துப்போதல் முதலான குறிகள் காணப்படில் அது வாதசிலேத்மச் சுரத்தின் குறிகளாகும்.

மூன்று தோஷச்சுரக் குறிகள்.

மூன்று தோஷச் சுரமிருமு முன்னந் நிகைக்குந் தலைநோவா
மேன்ற மூக்கு நாவுமிட்டு மரிப்பாம் வயிறு மிகக் கழியுந்
தான்ற தலையுந் தான்சுழலுந் தருகா கெந்த மிக நாறு
மேன்ற குணங்க ளிவையெல்லா மூன்றுதோஷச் சுரமென்னே. 64

(இ-ள்) இருமல், பெருமூச்சு, தலைவலி, மூக்கையடிக்கடி சொறிந்து கொள்ளல், அதிகமான வயிறு பேதி, தலைமயக்கம், நோயாளியிடமிருந்து துர்நாற்றம் வீசல் முதலான குறிகள் காணப்படில் அது மூன்று தோஷங்களும் சேர்ந்த ஜ்வரத்தின் (ஸந்நிபாதம்) குறிகளாகும்.

சுரத்தில் சுபகுணம்

கண்காவி யாகிமுக மதியே போன்று
கரநாடி வசுவமதாய்க் குயிலேவாக்காய்
பண்பாகத் தலைசொறியக் காது கேட்கப்
பல்லுமுல்லை யருப்பெனநா வமிர்தமூறு
உண்போது வியர்க்கவுகிர் சிவந்து தோன்ற
உள்ளங்கா லுடனுளங்கைச் சூடதாக
நண்பான பரிமளங்க ளறியப் பந்து
நற்குணங்க ளிவை சுரத்தை நாடுங்காலே. (65)

(இ-ள்) கண்களில் செந்நிறம், முகத்தில் சந்திரனின் சோபை, கையிலுள்ள நாடியின் நடை குதிரை போன்றும், வாக்குக் குயிலின் குரலைப் போலினிமை முதலான இவைகளும் உண்டாகும். காதுகள் சுத்தமாகக் கேட்கும். பற்கள் முல்லையரும்பைப்போல் வெண்மையாயிருத்தல், வாயில் சுத்தமான உமிழ்நீர் சுரத்தல், எகிர் சிவந்து இருத்தல், உள்ளங்கால், உள்ளங்கை இவைகளில் சூடு முதலான குறிகள் இருந்தாலும் நல்லது. வாஸனையை யறியும் சக்தியும் இருக்கவேண்டும். மேற்கூறிய குறிகளும் ஜ்வரம் அடித்தால் நோயாளி பிழைப்பான்.

சுரத்தில் அவகுணம்.

வாத பித்தச் சிலேத்மனமு மறிந்து நடக்கத் தலை நடுக்கக்
காதுள்ளிரைய முகங்கருக்கக் கைகால் முகங்கண் வெளுப்பேற
(இந்திரன் ஆர் தனுப்போ லுடல்வளையத் தொப்புள் கால்கை புரங்குளிரத்
தாது சிறுக்க விக்கலெழச் சாற்றுஞ் சுரத்தி லவகுணமே. (66)

(இ-ள்) வாதபித்தச் சிலேத்ம நாடிகள் நிதானமாகப் போகும். தலை நடுக்கும் காதுகளில் இரைச்சல், முகத்தில் கருநிறம், கைகள், கால்கள், கண்கள் முதலான உறுப்புகள் வெளுத்துப்போதல், உடம்பு வில்லைப்போல் வளைதல், தொப்புள், கைகள், கால்கள், மார்பு முதலான இடங்களில் குளிர்ச்சி, தாதுக்கள் க்ஷீணமடைதல், விக்கல் முதலான குறிகள் ஜ்வரத்துடன் சேர்ந்து காணப்படில் அது கெட்ட குறிகளாகும். வியாதி தீராது.

இதுவுமது

வாயும் பிதற்றக் களமிரைய மலர்போல் முகமுங் கறுத்திருக்கத்
தேயு நுதலாய் வியர்வைமிக ச்சிறிதும் வியரா துடப்புலர
மேயமலமும் பசந்திருக்க மேல்மூச்செரிய விக்கலெழ
வேயுங்குணங்க ளிவைசுரத்துக் கெழுந்தா லுயிரை யிழந்திரே. (67)

(இ-ள்) வாய் பிதற்றல், தொண்டையில் இரைச்சல், முகம் கறுத்துவிடுதல், வியர்வை அதிகமாதல் அல்லது வியர்வையே வியர்க்காது போதல், உடம்பு இளைத்தல், மலம் பசுமையாகப்போதல், மேல் மூச்சு, விக்கல் முதலானவை யுண்டாதல், முதலான குறிகளேற்பட்டால் அவை உயிரைப் போக்கும்.

சுரத்தில் தோஷம் வருங் காரணம்

பாகுபெரு பாகிலைச் சந்தனஞ் சவ்வாது
பரிமளங் கற்பூரம் டஞ்சுமெத்தை
வாகுபெரு நெய் யோடுசர்க்கரை நல்லெண்ணெய்
மலர்சிவந்த புடவை வெள்ளைப் புடவை தண்ணீர்
தோகையரை விருப்பல்காற் றடிக்கும் வீடு
துவர்ப்பினிப்புப் புளிப்புடனே கைப்புக்காரம்
வேகமுறு புத்தரிசி யன்னஞ் சோகம்
விசாரம் வழி நடைதோஷம் பேவுமென்னே. (68)

(இ-ள்) சந்தனம், சவ்வாது, கர்ப்பூரம் போன்ற பரிமளத் திரவியங்களின் உபயோகம், பஞ்சு மெத்தையில் சயனித்தல், சுத்த நெய், சர்க்கரை, நல்லெண்ணெய், சிவந்த புடவை, வெள்ளைப்புடவை முதலியவைகளைத் தரித்தல்,

ஸ்திரீ ஸம்போகம், காற்று அதிகமாக அடிக்கும் வீடு, துவர்ப்பான வஸ்துக்கள், தித்திப்புப் பதார்த்தங்கள், புளிப்புச் சுவை, கசப்புச் சுவையுள்ள பண்டங்கள், அதிக காரமான பதார்த்தங்கள் இவைகளை அதிகமாக உபயோகப்படுத்துவதனாலும், புது அரிசிச் சாதத்தையுண்பதாலும், வருத்தம், கவலை, அதிகமாக நடப்பது முதலான ஆகார விஹாரங்கள் சுரத்தையதிகரிக்கச் செய்யும்.

இதுவுமது

அடிக்கடி தண்ணீர் குடித்தல் பெண்பாலாசை
மடுத்தணைதலனம்நிரப்ப வருந்தக்கள்ளுக்
குடித்திடல்நீர் விட்டசோறுண்டல்காய்ந்து
கொதித்தநீர் குளிர்ந்தநீர் கூட்டியுண்ணல்
கடித்த தயிர் மோர்பால்நொங் கிளநீரென்க
கோளிலசத்த மாங்கிஷங்காடி யுளுந்தருந்தல்
துடித்தநிலாக் காந்திகுளிர் சரீரத்துற்றல்
சுரத்தின் மேல் தோஷமது துய்க்குங்காணே. (9)

(இ-ள்) அடிக்கடி தண்ணீர் குடித்தல், பெண்களின் மேல் ஆசை, ஸ்திரீ போகம், கள் முதலான போதை வஸ்துக்களையருந்துதல், தண்ணீர்விட்ட சாதம் (பழயமுது) உட்கொள்ளல், அதிகமாகச் சூடாக்கிய நீர், குளிர்ச்சியான நீர் இவைகளைச் சேர்த்து அன்னம் உட்கொள்ளல், கெட்டித் தயிர், மோர், பால், நொங்கு, இளநீர், மாம்ஸங்கள், காடி, உளுந்து முதலான பண்டங்களையும் நிதானமின்றி உபயோகித்தல், அதிகமாக நிலா வெளிச்சத்தில் இருத்தல் முதலானவைகளினால் சுரத்தில் தோஷங்கள் அதிகரிக்கும்.

இவைகளினால் வருந் தோஷங்கள் ஏழாவன

நிறையபத்தியமாந்தோஷம் நிரம்பிய தருணதோஷஞ்
சரசமாஞ் சங்கதோஷஞ் சாற்றிய விடமதோஷந்
திரமுறு விடமசீத தோஷஞ்சிவ் வகமாந்தோஷம்
பரவிய கிருஷ்ணசிவ்வு தோஷமும் படருங்காணே. (1)

(இ-ள்) அபத்திய தோஷம் — தருண தோஷம்
சங்க தோஷம் — விடம தோஷம்
விடமசீத தோஷம் — சீவக தோஷம்
கிருஷ்ண சீவக தோஷம் என்பன.

அபத்திய தோஷக் குறிகள்

படர்ந்திடுந் தோமுமேழின் குணமது பகர்வேன் மூர்ச்சை
யடர்ந்ததந் திரையே தாகம் பரதாப மங்கமோகம்

தடர்ந்திடும் வாயு மார்பிற் றேற்றுதல் சுரமே காய்தல்
நடத்திடில பத்தியத்தின் தோஷமின் னுமமாமே (2)

(இ-ள்) மயக்கம், சோம்பல், நாவறட்சி, தேகத்தில் எரிச்சல், வாயு மார்பில் பரவுதல், சுரமடித்தல் முதலான குறிகள் காணப்படில் அவை "அபத்திய தோஷக்" குறிகளாகும்.

தருண தோஷத்தின் குணம்

ஆகிய வங்கங் கம்பம் மயிர்க்கூச்சு மழலும்வேக
மேகிய தாபங் கைகால் குளிர்த லேயத் தேய்த
தோகைசந் தாபமோடும் பிரலாப முசயமென் னில்
தாகிய பிரமை கொள்ளிற் றருணமாந் தோஷந்தானே. (3)

(இ-ள்) கை, கால், முதலான உறுப்புக்களில் நடுக்கம், மயிர்க்கூச்சல், உடம்பில் எரிச்சல், அழற்சி, கை கால்களில் குளிர்ச்சி, காலேவேளைகளில் உளறல், முதலான குறிகள் காணும், இவைகள் தருண தோஷ லக்ஷணங்களாம்.

சங்க தோஷத்தின் குறிகள்

தானமா முடம்புநோவா மெரிந்திடு தானடக்த
மானகால் குளிர்ந்திருக்கு மடிக்கடி யெழுந்திருக்த
மீனமாம் பொய்யே சொல்லு மிருதய மிகவலிக்கு
மூனமாஞ் சங்கதோஷம் பிரமையு முண்டா மென்னே. (4)

(இ-ள்) உடம்பில் கடுப்புவலி, எரிச்சல், கால்களில் குளிர்ச்சி முதலான குறிகள் காணும். பொய் பேசுவான், படுக்கையைவிட்டு அடிக்கடி எழுந்திருப்பான், இருதயத்தில் வலியுண்டாகும். மயக்கமும் வரும் இவை சங்கதோஷக் குறிகளாகும்.

விடமதோஷக் குறிகள்

என்னுஞ்சந் தாபந்தாக மிவைபுடன் மூர்ச்சையுண்டாம்
மின்னுந்தா னுடிமிஞ்சிக் குடிலமாய்ப் பிசகியோடு
மந்நுந்தீ வரமதாகச் சுரங்காயும் வயிறு காந்தும்
தந்நூந்தான் விஷமதோஷ லக்ஷணஞ் சொல்லுங்காலே. (5)

(இ-ள்) உடம்பில் எரிச்சல், நாவரட்சி, மூர்ச்சை, நாடிகள் விபரீதமாகத் துடித்தல், அதிகமாகச் சுரம் காய்தல், வயிறில் எரிச்சல், இவைகள் விடமதோஷக் குறிகளாகும்.

விஷமசீத தோஷத்தின் குணம்.

காலமில் லாமல்மாறிக் குளிருடன் காய்ச்சலுண்டா
மேலவே தாகமுண்டா மேதிலு மபேட்சையுண்டாஞ்

சாலவே தடித்துநாக்கு முள்ளுப்போற் றலைவலிக்கு
மூலமே விஷயசீத தோஷத்தின் முறைமைதானே. (6)

(இ-ள்) சாயங்காலத்திலோ அல்லது விடியற்காலையிலோ மாறிமாறிக் குளிருடன் சுரம் அடிக்கும். தாங்க முடியாத நாவறட்சியேற்படும். எந்தப் பொருளிலும் விருப்பம் இராது நாக்கில் தடிப்பேற்பட்டு முட்களைப்போல் குத்தும். தலைவலியேற்படும். இவை விஷயசீத தோஷத்தின் குறிகளாகும்.

பித்த சிவ்வுக (ஜிஹ்வா) தோஷக் குறிகள்.

மாதுகேள் மயக்கந் தாபம் வளருமெய் வியர்வையுண்டா
மோதிய நாக்கு வெண்மை யுறுந்தடித் துலர்ந்துமுள்ளங்
காதிய பிரமையுண்டாங் காய்ச்சலு முண்டாமென்னிற்
றீதரு பித்தசிவ்வுக தோஷத்தின் செயலிதென்னே. (7)

(இ-ள்) மயக்கம், எரிச்சல், உடம்பில் வியர்வை நாக்கில் வெளுப்பு, தடிப்பு, உலர்தல், மனது பலஹீனம், சுரம், இவை பித்த ஜிஹ்வா தோஷத்தின் குறிகள்.

கிருஷ்ண சிவ்வுக தோஷக் குறிகள்

செயலின்றிப் பிரமையுண்டாந் தினவுண்டாம் வியர்வையுண்டா
மயலொன்றித் தாகமுண்டாம் வயிற்றிலுப் பிசமுமுண்டாம்
இயல்கொண்ட நாக்கில் முள்ளுங் கறுப்புமா யெழுந்திருக்கும்
புயல்கொண்ட கிருஷ்ண சிவ்வுக தோஷத்தின் புதுமை காணே. (8

(இ-ள்) காரணமில்லாமல் மயக்கமேற்படும், அரிப்பும் உண்டாகும். வியர்வை, நாவறட்சி, வயிற்றில் உப்பிசம், நாக்கில் முள்ளுப்போன்ற முளைகள், கருநிறத்துடன் காணும். இவை கிருஷ்ண சிவ்வுக (கிருஷ்ண ஜிஹ்வா) தோஷத்தின் குறிகள்.

7 வகை தோஷங்களிலும் சாத்யாசாத்யம்

புதுமையா மேழுதோஷம் புகன்றதிற பத்தியதோஷ
மிதமுறு தருணதோஷ மிவைதீருஞ் சங்கதோஷங்
கதுவிய விஷமதோஷங் கட்டசாத் தியமோர் மூன்றும்
பதியகல விக்குமென் றே பகர்ந்தன ராயுநூலோர். (9)

(இ-ள்) பத்திய தோஷம், தருண தோஷம் இவ்விரண்டும் தீரக்கூடிய நோய்களாகும். சங்கதோஷம், விஷமதோஷம், இவ்விரண்டும் கஷ்ட சாத்யமானவை. பாக்கி 3 வகை தோஷங்களும் தீராதென்று அறிந்துகொள்ளவும்.

சுரம் ஏற்படுவதற்கான குறிகள்

சுரத்தினி லாதமத்தி தோன்றிடுந் தோஷமாகும்
முரத்தெழு தோஷமுந்தா னுற்பவ குணமே தென்னில்
வருத்திடு மயக்க மூர்ச்சை மார்பு நோம் வாய் பிதற்று
மரத்தினை யொப்பு நாவு வறண்டிடு மறிகுவீரே. (10)

(இ-ள்) மயக்கம், மூர்ச்சை, மார்பில் வலி, வாய் பிதற்றல், நாக்கு மரத்தைப்போல் வறண்டுபோம். இவைகள் சுரம் ஏற்படும்போது உண்டாகும் குறிகளாகும்.

சுரம் அறுபத்து நான்கிற்கும் சாத்யாசாத்ய அட்டவணை

வாதப்ரகோப ஜ்வரம் 20-ம் சாத்யாசாத்யம்

1. வாதஜ்வரம்
2. வாத பித்த ஜ்வரம்
3. வாதசீத ஜ்வரம்
4. வாதவத்தி ஜ்வரம்
5. ஆகீகவாத ஜ்வரம்
6. வாதகணச் சுரம்
7. சாதுர்த்திக ஜ்வரம்
8. மாந்த ஜ்வரம்
9. வாத அதிஸாரச்சுரம்
10. வாதமந்தச் சுரம்
11. அசீர்ண வாதச் சுரம்
12. உதிரி வாதச் சுரம்

இவை சாத்யம்.

1. வாத சிலேற்பனச் சுரம்
2. சன்னிவாதச் சுரம்
3. பூதச்சுரம்
4. பிரேதச் சுரம்
5. பிரதாபவாதச் சுரம்
6. வாத வைசூரிச் சுரம்
7. வாத சோகச் சுரம்
8. விரணவாதச் சுரம்

இவை அசாத்யம்.

பித்தத்தில் அசாத்யம் பதினான்கின் வகை

1. பித்த ஜ்வரம்
2 பித்தச் சிலேத்ம ஜ்வரம்
3. பித்தவாத ஜ்வரம்
4. அஸ்தி ஜ்வரம்
5. சங்கிரக அஸ்தி ஜ்வரம்
6. பித்த சோகை ஜ்வரம்
7. பித்த அதிஸார ஜ்வரம்
8. பித்த தாக ஜ்வரம்
9. பித்த விஷம ஜ்வரம்
10. பித்த அஸ்தி ஜ்வரம்
11. பித்தமாறல் ஜ்வரம்
12. பித்தப் பிரதாப ஜ்வரம்
13. பித்த அசீர்ண ஜ்வரம்
14. பித்த சீத ஜ்வரம்

ஆக இவ்வகை அசாத்யமானவை.

ஸாத்யம் பத்தின் வகைகள்

1. பித்த சிலேத்ம ஜ்வரம்
2. பித்த சன்னி ஜ்வரம்
3. சயச் சுரம்
4. இரத்த வைசூரிச் சுரம்
5. கரபாத ஜ்வரம்
6. மாந்த பித்த ஜ்வரம்
7. பித்தப் பிரமேக ஜ்வரம்
8. பித்த கண ஜ்வரம்
9. பித்த பிரதாபச் சுரம்
10. பித்த வ்ரணச் சுரம்.

சிலேத்மத்தில் ஸாத்யம் பத்தின் வகை

1. சிலேத்ம பித்த ஜ்வரம்
2. சிலேத்ம வாத சுரம்
3. சலாசயச் சுரம்
4. மாங்கிஷ வைசூரிச் சுரம்
5. சிலேத்ம கணச்சுரம்
6. சிலேத்ம தோஷ ஜ்வரம்
7. சிலேத்ம அதிஸார ஜ்வரம்
8. சிலேத்ம சீத ஜ்வரம்
9. சிலேத்ம ஜ்வரம்
10. ஆம சிலேத்ம ஜ்வரம்.

சிலேத்மத்தில் அஸாத்யம் பத்து

1. சிலேத்ம சன்னி ஜ்வரம்
2. ஆகிக சிலேத்ம ஜ்வரம்
3. விஷம சிலேத்ம ஜ்வரம்
4 சிலேத்ம பஞ்சாகி சுரம்
5. சிலேத்ம மாகிக ஜ்வரம்
6. சிலேத்ம மோக ஜ்வரம்
7. சிலேத்ம விக்ருதிச் சுரம்.
8. ....
9. ....
10. ....

சிரரோக நிதானம்

கண்களிற் பீளைசாயுங் கால் கைகள் கடுத்துக் குத்து
மெண்படப் புகைந்து சற்றே யிருமிமே லிளைப்புண் டாகும்
புண்பட நெஞ்சு நொந்து நாசியிற் பொய்நீர் பாயும்
வண்படும் நூலோர் சொன்ன வாதபீ னிசமதென்னே. (1)

(இ-ள்) கண்களில் பீளை சாறும் கை கால்களில் கடுப்பு வலியேற்படும். புகைச்சலெடுக்கும். இருமல், மேல் மூச்சு, நெஞ்சில் வலி, மூக்கில் நீரொழுகல் முதலான குறிகளேற்படில் அது வாத பீனிஸமாகும்.

பித்த பீனஸக் குறிகள்

இருமிக் குவளை மிகுந்து விழு மீரவாடை யேற்குமென் னிற்
கருமேலேறும் நெஞ்சுதன்னிற் காசசுவாஸ மிளைப்பெடுக்கும்
பொருமுமுதர மேப்பமிடிற் புலால்போல் நாறும் பிடர்கனக்கும்
பெருகும் நாசி நீர் பெருகும் பித்த பீனிஸக் குணமாமே. (2)

(இ-ள்) இருமலுடன் கோழை அதிகமாக வெளியாகும். குளிர் வாடை பட்டால் நெஞ்சில் கபம் கட்டி இருமல், மேல் மூச்சு, இரைப்பு இவைகளை

யுண்டாக்கும். வயிறு பொருமும். ஏப்பம் விட்டால் மாம்ஸவாடை வீசும். பிடரி கனக்கும். மூக்கிலிருந்து சதா நீர் வடிந்துகொண்டிருக்கும். இவை பித்த பீனிஸக் குறிகளாகும்.

சிலேத்ம பீனிஸக்குறிகள்

தலையும் வலிக்கும் நாசிதன்னிற் சளிபோல் மாறுச் சலமோடும்
அலையும் நாளே மூசென்றால் வறண்டே யிறுகித் திரண்டுவிழு
முலையும் மிகவே நாற்றமதா மூடே தண்ணீர் தாகிக்குஞ்
சில முஞ் சென்று மூக்கடைக்குஞ் சிலேத்ம பீனஸ மிதுவாமே. (3)

(இ-ள்) தலைவலியுண்டாகும் மூக்கிலிருந்து சளிபோல் நீர் சதா ஒழுகிக் கொண்டேயிருக்கும். 7 நாட்கள் சென்றபின் சளி இறுகிக் கெட்டியாக விழும் மூக்கிலிருந்து நாற்றம் வீசும். தண்ணீர் தாகமுண்டாகும். இன்னும் சில நாட்கள் சென்றால் மூக்கடைப்பு ஏற்படும்.

வாதபித்த பீனிஸக் குறிகள்

கருகிய நிறமதாக முகத்தினிற் கறுப்புக் காணும்
பருகிய பல்லுக்கூசும் படர்விழி நிறஞ் சிவக்கும்
செருகிய தலை கனக்கும் நாசியிற்சி ராய் சீவீழும்
பெருகிய வாதபித்தப் பீனிஸ மென்னலாமே. (4)

(இ-ள்) முகத்தில் கறுப்புநிறப் புள்ளிகள் காணும். பற்கள் கூசும். விழியில் சிவப்புநிறம் காணும். தலை கனக்கும் மூக்கிலிருந்து சிராய்போலும் சீழ் போலும் சளி கொட்டும். இவை வாதபித்தப் பீனிஸக் குறிகளாகும்.

வாதகப பீனிஸக் குறிகள்

தார்குழல் மானே! கேளாய் தலையிள மையில் நரைக்கும்
கூர்விழி யொளிவு மாறுங் குலைந்தலைந் தசையும் பல்லுச்
சீர் சிரங் கூத்திடிக்குஞ் சிந்திடும் நாசி நீருய்
வார் தரும் வாதசேத்ம பீனிஸ வளமை தானே. (5)

(இ-ள்) தலை இளமையிலேயே நரைக்கும். பார்வையும் குறையும். பற்கள் ஆட்டம் காணும். தலை, உடம்பு இவைகள் கனக்கும். மூக்கிலிருந்து ஸதா நீரொழுகும். இவை வாதசிலேத்ம பீனிஸக் குறிகளாகும்.

பித்த சேத்ம பீனிஸக் குறிகள்

.... சிராய் சீழ்விழும் நாவது கசந்தினிக்கும்
மோசையாஞ் சிரசிற் கொட்ட வோடுபோ லுணர்ச்சி மாறும்
வீசியே இறுகிறென்னும் வெதும்பியே தலையிடிக்கும்
பேசிய குணங்கள் பித்த சேத்மபீ னிசமி தென்னே.

॥ श्रीः ॥

तंजावर सरस्वतीमहालाचें धावतें दर्शन

(तंजावरचा संक्षिप्त इतिहाससहित)

लेखक

श्री एस्. गोपालन्, बी. ए., बी. एल्.,

सन्माननीयचिट्णीस, सरस्वतीमहाल ग्रंथालय, तंजावर.

अनुवादक

गो. नागराजराव्

मराठी पण्डिट्, सरस्वतीमहाल ग्रंथालय, तंजावर.

प्रकाशक

श्री एस्. गोपालन्, बी. ए., बी. एल्.,

सन्माननीयचिट्णीस्, कार्यवाहक मंडळी, सरस्वतीमहाल ग्रंथालय, तंजावर.

इ. स. १९६०.

शके १८८२. किम्मत् ५० न-पै.

श्रीवाणीविलासमुद्रणालयः,
श्रीरङ्गम् ।

तंजावर सरस्वती महालाचें धांवतें दर्शन

जगांत आश्चर्यकारक वस्तु सात आहेत असें अनुमान आहे. त्यां बरोबर तंजावर सरस्वती महाल ग्रंथालयांसी मिळवून, जगांत आश्चर्येदायक वस्तु आठ आहेत असें मानिलें तर कांहीं अतिशयोक्ती होणार नाहीं.

सरस्वती महालाचें वैशिष्ट्य थोडक्यांत सांगणें हे कांहीं सोप काम नव्हें. पूर्वीचा इतिहास, प्राचीन वस्तु संग्रह, जुने पुराणे ग्रंथ वगैरे वगैरेंचे प्रदर्शनस्थळ नव्हे हें सरस्वती महाल ग्रंथालय.

सरस्वती महाल हें आजकालचें अत्यंत श्रेष्ठ कला भाण्डार आहे असेंच म्हटलें पाहिजे. येथें इतिहास, संगीत, वैद्यक, विज्ञान शास्त्र इत्यादी विषय संशोधन करण्यास अनेक तऱ्हेचीं साधनें आहेत. जगाच्या कल्याणासाठीं शेंकडो वर्षांपासून जपून सांठवून ठेवलेला पारंपर्य निधी म्हणजे हें सरस्वती महाल ग्रंथालय.

या ग्रंथालयांत त्रिविध कलाचार गोवून एकत्र केलेलें आहेत. तामिल देशाचे चोळराजे, आंध्र देशाचे नायिक राजे, व मराठे राजे हे तीघेंही सरस्वती महालाचे उन्नती साठीं म्हणून फार परिश्रम घेतले आहेत म्हणायाचें, हें या ग्रंथालयांत डोंकावणाऱ्या प्रत्येक माणसास कळून येईल. इतुक्या बरोबर पाश्चिमात्य कलाचारहीं सामील झाल्यानें सरस्वती महालाचें वैशिष्ट्य जगाचें कोणाकोपऱ्यांतहीं पसरलें गेलें आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी

सरस्वती महालांत डोकावण्याच्या आधीं त्याचें इतुकें वैशिष्ट्यास कारण काय आहे हें समजून घेणें आवश्यक होय. तंजावरच्या इतिहासावरूनच सर्व काहीं उलगडा होवून शकेल. पहिल्यानें "मुत्तरैयर" हे तंजावरावर राज्य करीत होते असें इतिहासकार सांगतात. तंजावरास पश्चिमेस "तिरुक्काट्टुप्पळ्ळि" म्हणून एक गांव आहे. त्याचे समीप असणारें आजचें खेडे गांव "सेंदले" हे मुत्तरैयारांचे राजधानी होती इतुकें मात्र कळून येतें; परंतु मुत्तरैयरांची इतर कांहीं माहिती आपुल्याला उपलब्ध होत नाहीं. नवव्या शतकांत पल्लव राजांचे माण्डलीक म्हणून असलेले मुत्तरैयर यांना, चोळ वंशांतील एक राजा "विजयालयन्" यानें (इ. स. ८५० ते ९०७) जिंकून तंजावर राज्य हस्तगत केल्याचें कळून येतें ॥

चोळराजे:— नावांतच किती मोहकता व कीर्ति! चोळराजे पांडवांचे समकालीन होय. कौरवपांडवांच्या युद्धामुळें पराक्रमानें गाजून गेलेल्या त्या इतिहास प्रसिद्ध कालांतच चोळराजे शौर्यानें नांवांजले होते. सम्राट् अशोकाच्या दगडी खांबावरच चोळदेशाचें व चोळराजांचे पराक्रमा-विषयीं उल्लेख केलेले आहेत. त्यावरून अशोकाचे कारकीर्दीपूर्वी, म्हणजे ख्रिस्त पूर्वी २५० वर्षा-लाहीं पूर्वीच चोळराजांची कीर्ति चारी दिशेस फांफावली होती हें सिद्ध होतें. अंदाजानें कमीत कमी २००० वर्षें तरी चोळ वंश टिकून राहिला असला पाहिजे. त्या अवधींत जगविख्यात चोळ राजे अनेक होऊन गेलेत. इ. स. तेराव्या शतकांत चोळवंश नष्ट झाल्याचें इतिहासावरून कळून येतें.

चोळ राजांचे कारकीर्दींत पुष्कळशा अमरकाव्यांचा जन्म झाल्यानें, तामिळ् वाङ्मयाला एक खास शोभा आणिली आहे. म्हणून चोळराज्याची राजधानी जे तंजावर, येथें ते सगळेहीं ग्रंथ अमूल्य रत्नासारिखें अजून जपून ठेवण्यांत आलेले आहेत. यांत नवल तरी काय!

नायकराजे:— चोळवंश अस्तंगत झाल्यावरोबर तंजावरांत नायक राजांचे हातीं राज्यसूत्र आलें. चौदाव्या शतकाचे अखेरपर्यंत चोळवंशीय राजांचा अम्मल तंजावरांत चालू होता. नंतर विजयानगरचे नायक राजे यांनीं चोळदेशास आपल्या साम्राज्यांत सामील करून, प्रतिनिधि नेमून, त्यांचेद्वारा तंजावरांत ते राज्य करते झाले. अच्चुतप्पनायक यानें इ. स. १५३२ त सेवप्प नायक यांस राजप्रतिनिधि म्हणून नेमलें. हेच तंजावर नायक राजांचे मूल पुरुष होत. हर एक-नायकराजे सर्वकलावल्लभ होते. तसेंच त्यांच्या पट्टराण्याहीं मोठ्या विदूषी होत्या. मंत्री, प्रधानहीं मोठे चतुर व विद्यापारंगत होते. नायक राजांच्या संस्थानांत, संस्कृत, आंध्र, तामिळ् इत्यादि भाषेंत नावांजलेले पण्डित, कवि, नाटककर्ते अगणित होते. इ. स १५३२ ते १६७३ पर्यंतच्या नायक राजांनी स्वतः रचिलेले अनेक अपूर्व ग्रंथ तंजावर सरस्वती महालांत आजहीं पाहतां येतील. त्या ग्रंथांची भाषा शैली पाहून आजकालचे विद्वानलोक विस्मयानें थक्क होतात.

मराठेराजे:— इ. स. १६७४ मध्यें तंजावर राज्य नायकराजांच्या हातांतून सुटलें आणि मराठेराजांच्या ताब्यांत आलें. छत्रपति शिवाजी महाराजांचे सापत्न बंधु एकोजी राजे हे तंजावरचे पहिले मराठे राजे होय. त्या एकोजींच्या वंशांत आलेले एकूण एक मराठेराजे मोठे आस्थेवाईक असून विद्याव्युत्पन्न होते. त्यांतील अनेक राजे विविध भाषा शिकलेले असून त्यांनीं तामिळ्, आंध्र, संस्कृत, मराठी इत्यादी भाषेंच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. आज

सरस्वती महाल ग्रंथालय इतुक्या उन्नतीला व प्रख्यातीला पोंचलें आहे, कां तर ते 'राजे शरफोजी यांच्या मेहनतीनेंच म्हणावें; म्हणूनच या ग्रंथालयाला "राजे शरफोजी यांचें सरस्वती महाल ग्रंथालय" असें नांव पडलें आहे. या ग्रंथालयांत, राजे शरफोजी यांनीं बहुपरी परिश्रम करून जमविलेले नानाभाषेंतील हजारो ग्रंथ आजहीं उपलब्ध आहेत.

श्रीमन्त तुळजाराजे व त्यांचे चिरंजीव शरफोजी राजे या उभयतांचे कारकीर्दीत इंग्रजी व फ्रेन्च् इत्यादी भाषेंतील पाश्चात्य कलात्मक ग्रंथांचा संग्रह येथें झाल्यानें, अनेक शतकांपासून पोसून आलेलें हें ग्रंथालय, आज अमरकीर्तीला पोंचलें आहे म्हणून वारवाणिल्यास कांहीं अतिशयोक्ति होणार नाहीं.

तंजावरचा इतिहास वाचकवृंदांना चांगला समजून यावा अशा हेतूनें चोळराजांचे कालापासून अखेर पर्यंतचा, म्हणजे इ. स. १८५५ मध्यें मराठयांचें राज्य खालसा होई पर्यंतची हकीकत समग्रहीं, या पुस्तकाचें मागील परिशिष्टांत जोडली आहे.

ग्रंथालय

आतांपर्यंत सरस्वती महाल ग्रंथालयाची थोडी बहुत माहिती आपण मिळविली, तेव्हां आतां आपण ग्रंथालयांतच शिरूं या.

पण तसें शिरण्यापूर्वी तेथें पहा! तुम्हाला काय दिसतें! ग्रंथालयाच्या बाहेरील पटांगण्याच्या पलीकडे एक छानदार मोठा मंडप असून त्यांत एक संगमरवरी दगडानें बनविलेला एक भव्य पुतळा हात जोडून उभा आहे. तोच तो राजे शरफोजी यांचा पुतळा. त्यांनी हयात असतांनाच इ. स. १८०७ मध्यें ईस्ट् इण्डिया कंपनीच्या चालकांनीं हा पुतळा स्थापिला. फ्लॅक्समन नांवांच्या एक कलाविशारद शिल्पीनें फार परिश्रम करून हा पुतळा घडविला. पुतळा अति सुन्दर असून, हिन्दु आचारानुसार नम्रभावें हात जोडून ग्रंथालयाकडे पाहत उभा आहे. पहिल्यानें हा पुतळा राजचिन्हानुसार उपसलेल्या तलवारीसहित लष्करी बाण्यांचा केलेला होता; परंतु राजांच्या विनवणीनें तो बाणा बदलवून कलादेवी सरस्वतीला नम्रपणे वंदन करण्याचा त्यांचा हेतु त्यांतून दाखविला आहे असें सांगतात.

ज्या दगडावर पुतळा उभा आहे, तो काळारंगाचा, गुळगुळीत एकच दगड असून, तो लांबीनें १८ फूट् ६ इन्च् व रुंदीनें १६ फूट् ६ इन्चाचा आहे. हा नायक कालांतील दगड आहे.

राजा शरभोजी यांचा पुतळा

सिलहखाना

पुतळा उभा आहे तो मंडप इ. स. १६ व्या शतकांत बांधलेला नायक राजांचा दरबार मंडप होय. ह्या मंडपाची निर्मितीची खुबी अशी आहे कीं, कुणी ह्या मंडपांत उभा राहून बोलूं लागला तर त्याचें बोलणें ३०० वार दूरावर हुबेहुब ऐकतां येतें.

आतां येथून सरस्वती महालांत जाऊं. पण मध्येंच महा! एका बाजूस अति पुरातन युद्ध-सामुग्रीगृह, आणि दुसऱ्या बाजूला बिनचूक वेळ दाखविणारें यंत्र ठेवलेली चौकी. नायकांचा दरबार मंडप, व सरस्वतीमहाल ह्या मधील पटांगणाला दोन्ही बाजूस दिसणाऱ्या या युद्धसामुग्रीगृह व

नायक-दरबार आणि पूजागृह व यंत्रचौकी

यंत्र चौकीमुळें विशेष शोभा आली आहेना! वर सांगितलेला पुतळा मंडप, त्याच्या उत्तरेस असलेले नायकराजांचें पूजा गृह, व युद्धसामुग्रीगृहाच्या पायाशीं असणारा मंडप, यांतच हल्लीचें तंजावर शिल्पकला वस्तुसंग्रहालय निर्माण झालें आहे.

इतुक्यावर ग्रंथालयांत शिरूं. या! आंत शिरल्या बरोबर आम्हा सर्वांना नकळत भक्तीची जाणीव होतें. कारण, सरस्वती महाल हें नांव व आंतील देखावा. हा मंडप नायकराजांची निर्मिती होय.

सरस्वतीमहल-आंतील देखावा

आज आम्हास दृग्गोचर होणारीं अनेक सुंदर देउळें, त्याच प्रमाणें नक्षीकामानें ओथंबलेले मंडप, चोळ व नायक वंशस्थ राजेलोकांकडून बांधविण्यांत आले आहेत. प्रसिद्ध मराठे योद्धे राजे इमारती बांध-कामांत पारंगत नसले, तरी सर्व कलाभिमानी असल्या कारणानें पूर्वींच्या सगळ्याही इमारती त्यांनीं जपून ठेविल्या आहेत. त्यांनीं तसें केलें नसतें तर चोळ व नायकराजांनीं बांधविलेलें हें सर्व बांधकाम व शिल्प आज नामोहरम होवून गेलें असतें.

राजे शरफोजी यांनीं जमविलेलीं छापील पुस्तकें

सरस्वती महालांत शिरल्या बरोबर पहिल्यानें आमुच्या नजरेस पडणारे कोण म्हणजें, सरस्वती महालाचे चिरकाल अस्तित्व दर्शविणारे पुष्कळ जुने पदार्थच. हें पाहिलांत काय! तेथें दिसणारीं लांकडीं कपाटें! तीं शतकानुशतकांचीं आहेत. ग्रंथालयाचें पूर्वेकडील कपाटांत राजे शरभोजी यांनीं, मेहनतीनें मिळविलेलीं छापील पुस्तकें आहेत. प्रत्येक पुस्तकांतही कलोपासक शरफोजी राजांची सही आहे. वाचनांत शरफोजीसारिखें कुणीच नव्हतें असें म्हटलें तरी चालेल. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. त्यांनीं इंग्रजी, लॅटीन्, फ्रेन्च्, जर्मन्, ग्रीक्, इटालियन् इत्यादी भाषेंत, यूरोपहून पुस्तकें मागवून, तीं वाचून, ते आनंद मानीत असत. शरफोजीस भाषाज्ञानच मात्र नव्हे, तर ते सर्वकलेंत कुशलही होते. त्यांतून त्यांना विज्ञानशास्त्रामाजी फार आवड होती असें दिसतें. ह्याला साक्ष येथें दिसणारीं छापील पुस्तकें व पोथ्याच होत. फारच उत्कृष्ट म्हणून आजकाल नांवें गाजविणाऱ्या अनेक इंग्रजी पुस्तकांच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रती, राजे यांनीं जमविल्या आहेत. त्यावेळचा सुप्रसिद्ध ग्रंथकर्ता थॅकरे ह्यानें सतत प्रसिद्ध केलेले ग्रंथ व तसेंच विलायतेंत छापून प्रसिद्ध केलेलीं अनेक वाङ्मयीन मासिकें, राजे शरफोजींच्या सहीनिसी आजही येथें पाहण्यास मिळूं शकतात. इतुकेंच नव्हें. तर बहुतकरून सर्वभाषांचे कोश व व्याकरण आणि रंगी बेरंगी चित्रांनीं सजलेले अनेक ग्रंथही येथें आहेत. थोडक्यांत सांगायाचें म्हणजें, सरस्वती महालांत कोणत्या कोणत्या शास्त्रांमाजी ग्रंथ जमविले गेले आहेत हे सांगण्यापेक्षां, कसल्या शास्त्रामाजी ग्रंथ नाहींत हें सांगणें सोप होय. कारण, येथें कसल्याही

राजा शरभोजीचा बाज

शास्त्रामाजी ग्रंथ नाहीं असें नाहीं. राजे शरफोजी यांनीं सर्वहीं शास्त्रसंबंधीक ग्रंथांचे संग्रह केले आहेत.

तस्वीरी आणि चित्रं

ग्रंथालयासाठीम्हणून शरफोजी राजे यांनीं मिळविलेल्या ग्रंथांबरोबर, अगणित रंगीत चित्रें व सृष्टिसौन्दर्याचीं छाया चित्रेंहीं जमविली आहेत. त्यांच्या कालांत इंग्लंड, यूरोप, हिन्दुस्थान येथें नांवाजलेले लण्डन् शहर, यूरोपाचीं अनेक शहरें, व हिमगिरीचें सृष्टिसौंदर्य दाखविणारीं अनेक चित्रेंहीं त्यांनीं गोळा केली आहेत.

ही सर्वहीं आज आमच्या डोळ्यांचीं पारणें फेडितात. इतकेंच नव्हें! तर आपल्या संस्थानांतलया प्रसिद्ध अशा चित्रकारांकडून, आपण बाळगिलेले घोडे, पांखरें, हुजूरलोकांचे पोषाख इत्यादींचीं चित्रें त्यांनीं स्वाभाविक रंगानें रंगवून घेतली आहेत. त्या दीर्घदर्शी-राजानें पुढच्या पिढींत निपजणाऱ्या संशोधकांच्या उपयोगासाठीम्हणून कीं काय, परप्रांतीय व विदेशी चित्रकारांकडून-ही शरीरशास्त्र, वनस्पतिशास्त्र, इत्यादिकांच्या विषयाचीं चित्रें त्या त्या रंगांत काढून घेतलेलीं आहेत. त्यांनीं जमविलेल्या चित्रांपैकी नानादेशीय जनांच्या तऱ्हे-तऱ्हेच्या पोषखांचीं चित्रें, तसेंच युद्धशास्त्र, व्यायामशास्त्र इत्यादींच्या पुस्तकांकडे आपलें लक्ष वेधल्याशिवाय राहत नाहीं.



श्रेष्ठ जाति चा शरभोजीचा अश्व

कलारसिक राजे शरफोजीं यानीं मिळविलेल्या सामुद्रिकालक्षण ग्रंथपैकी एका फ्रेञ्च ग्रंथकर्त्यानें प्रसिद्ध केलेला ग्रंथ फारच महत्त्वाचा होय. तो ग्रंथ आज दुर्मिळ आहे असें निक्षून सांगतो येईल. त्या ग्रंथांत नानाविध पशूंची तोंडें लिहून त्या खाली हुबेहुब त्याचप्रमाणें असणाऱ्या मानवाचीं तोंडें दर्शवून त्या तोंडाच्या साम्यावरून मानवाच्या गुणाचें वर्णन केलेलें आहे.

एका फ्रेंच ग्रंथ कर्त्याचें सामुद्रिक शास्त्र ग्रंथांतील चित्र.

मराठी हस्तलिखित पोथ्या.

आतां शेजारच्या कपाटांत काय आहे तें पाहूं. हें पहा! यांत मराठी हस्तलिखित कागदी पोथ्या ठेविल्या आहेत. ह्या पोथ्यांचें वर्गीकरण करून करुप्पूरच्या कापडांत त्या बांधून ठेविल्या आहेत. लाक्षाद्रव्यानें रंगविलेलें तें करुप्पूरचें कापड आज दुर्मिळ आहे. तत्वशास्त्र, व्याकरणशास्त्र, संगीतशास्त्र, विज्ञानशास्त्र, वैद्यकशास्त्र, नाट्यशास्त्र इत्यादी ग्रंथ यांत आढळतात. विशेषेकरून शरफोजी व इतर मराठे राजे यांनीं रचिलेलीं अनेक नाटकें यांत आहेत. हें पहा! हीच ती भूगोलवर्णनाचा "देवेन्द्र कुरवञ्जी" नाटिका. ही नाटिका राजे शरफोजी यांनी स्वतः रचिली आहे. या नाटिकेंतून इन्द्रलोकांतील एका बुरुडस्त्रीनें भूलोकांत हिंडून आपण पाहिलेल्या सर्व देशांचें सविस्तर वर्णन केल्याचें आढळतें. आपल्या संस्थानांतील मुलांनीं अति सुलभरीतीनें भूगोळ शिकावा, अशा हेतूनें शरफोजी राजे यांनीं ही पद्यात्मक नाटिका रचिली आहे. किती त्या राजाचा दूरदर्शीपणा!



वरचें — परीक्षित आणि शुकदेव (भागवत)
खालचें — पार्थसारथि (भारत)

मराठी हस्तलिखित पोथ्यां मध्यें महाभारत व भागवत या दोनी ग्रंथांना मुख्यस्थान मिळालें आहे. चित्रकारांनीं ह्या भारत भागवत पोथ्या अवश्य पाहिल्या पाहिजेत. कारण मुखपृष्ठावरील नाना रंगांनीं रंगविलेलीं हीं चित्रें पाहिल्यानें, आमच्या मनांत हीं सारीं चित्रें आतांच काढलेलीं आहेत, अशी शंका उत्पन्न होते. प्रत्येक चित्र त्या त्या संदर्भानुसार काढलें गेलें आहे. या अत्यंत विस्तृत महाभारत ग्रंथाचा कर्ता श्री माधवस्वामी, हे श्री एकनाथांचे दौहित्र आणि श्री समर्थांचे प्रशिष्य होत. श्रीकावेरीनदीच्या तीरीं मायूरम् शहराच्या नजीक त्रिवंदूर-आजचें तिरुवेळंदूर-या गांवीं श्रीरामचन्द्राच्या मंदिरांत माधवस्वामींचा वास होता. हीं चित्रें अंदाजानें २५० वर्षांपूर्वी काढलीं गेलीं असावी असें वाटतें. तरी रंग फिकट न होता, तीं आजच काढल्या प्रमाणें दिसत आहेत; हें नवल नाहीं काय!

आपण मराठी पोथ्या पाहिल्या. आतां ताडपत्रावर लोखण्डी कलमानें कोरलेले तेलंगी भाषेचे ग्रंथ बघूं. तंजावर संस्थानांत, नायकराजांबरोबर त्यांची तेलंगी भाषा लुप्त होऊन गेली नाहीं हें अगोदर लक्षांत ठेविलें पाहिजें. बहुतेक सर्व मराठे राजेजन तेलंगी भाषेमध्ये व्युत्पन्न होते; व त्या भाषेंतील साहित्याकडे दुर्लक्ष न करिता तिच्या बद्दल ते फार आदर बाळगीत होते. नायकराजांमधील रघुनाथ नायक, विजयराघव नायक, व त्यांच्या पट्टराण्या रामभद्रांबा, रंगाजम्मा, आणि दरबारचे विद्वान लोक, तसेंच इतर कविजन वगैरेंनीं रचिलेले अनेक तेलंगी ग्रंथ या विभागांत आहेत. हीं पहा! हींच तीं यक्षगानें म्हणजे तैलंगी भाषेंतील नाटकें. तंजावरा नजीक मेलट्टूर, शालियामंगलम् वगैरे गांवांत हीं नाटकें आजहीं चालू आहेत.

आतां हें विचित्र पहा! तैलंगी लिपींत तामिल् वाङ्मय. नागरी आणि तामिल-लिपींत तैलगी वाङ्मय. ह्याच प्रमाणें तामिल वाङ्मय नागरी लिपींतहीं संस्कृत वाङ्मय तेलंगी भाषेंतही लिहिले गेले आहे. यावरून तामिल् देशांत आंध्र वाङ्मयास महत्त्व किति होतें हें आम्हीं जाणूं शकतों आणि यामुळेच तामिल् देशानें आंध्र भाषेची किती उत्कृष्ट सेवा केली आहे हे सर्वलोक जाणतात व मानितात.

वरचे — छत्रपति शिवाजी व त्यांचे गुरु रामदासस्वामी
खालचे — शब्दभूषण ग्रंथाचे कर्ते नारायणसुधी

तैलंगी वाङ्मयांतील 'रघुनाथनायकाभ्युदयमु' व "कट्टवरदराजु रामायणमु" या दोन्ही ग्रंथांचा उल्लेख करणें आवश्यक आहे. रघुनाथनायकाभ्युदयमु यांत चार शतकापूर्वीचे राजवाड्याचे वर्णन केलें आहे. राजवाड्याचा प्रवेशद्वारापुढें उभा आहे तो कळंबाचा वृक्ष व सरस्वती महाल हे दोन्ही ४०० वर्षांपूर्वीचे आहेत, असें या ग्रंथावरून कळून येतें. शिवाय राजवाड्याच्या दरवाज्या समोर आजहीं आमच्या नजरेस दिसणाऱ्या पीलखान्यांत हत्ती बांधून ठेवीत असत असेंहीं त्यांतूनच कळतें. समोर दिसत आहे तो संगीत महाल त्याच कालांत ध्वनी शास्त्र जाणणाऱ्या चांगल्या शहाण्या कारागीरांकडून बांधण्यांत आला हेहीं कळतें. आज कालचे कलाकार त्या संगीत महालाची बांधणी पाहून तोंडांत बोट घालतात. हा संगीत महाल सोळाव्या शतकाच्या आरंभापासून आहे असें रघुनाथनायकाभ्युदयमु मधून कळतें.

तामिललोकांना कम्बरामायण, हिन्दीलोकांना तुलसीदास रामायण जसें प्रिय व पूज्य वाटतें, त्यांहूनी अधिक प्रिय व पूज्य असें कट्टवरदराजुरामायणमु तैलंगी लोकांकडून मानिलें जातें. सरस्वती महाला शिवाय दुसरे कोठेही हा ग्रंथ उपलब्ध नाहीं. या ग्रंथाचा कर्ता जो कट्टवरदराजु हा चोलवंशस्थ असून त्यानें आंध्र भाषेंत प्रचंड असा श्रेष्ठ रामायण ग्रंथ लिहिला आहे म्हणून त्याला धन्यवाद दिल्या वांचून कोण राहील!

मराठे राजे शहाजी जन्मतःच संगीत शास्त्रांत व्युत्पन्न होते. त्यांनीं रामभक्त ब्रम्हश्री त्यागेय्या सारखें ५०० हून अधिक काव्य ग्रंथ आंध्र भाषेंत रचिले आहेत. तें समग्र काव्य ग्रंथ आजहीं सरस्वती महालांत पाहवयास मिळतात.

तमिऴ् पोथ्या

आतां तमिऴ् विभागाकडे वळूं. तंजावर राज्यांत चोळ नृपतींच्या कारकीर्दीतच मात्र नव्हे, तर नंतर आलेल्या नायक, मराठे राजांचे कालांतहीं तामिऴ् वाङ्मय प्रसिद्धच होतें. तिरुचिट्रम्बलकोवैयार, तिरुवायूमोपिबाचकमालै, नालडियार, पेरुदेवानार् भारतम् व तिरुक्कुरळ् पाठभेद इत्यादी तामिऴ् ग्रंथ टीकांमुळें या तामिऴ् विभागाला विशेष शोभा आणिली आहे. अजुन या विभागांत शेंकडो वर्षांचे जुने पुराणे ग्रंथ तसेंच पुढच्या संततीस उपयोगी पडण्या लायकीचें वाङ्मयहीं जपून ठेवण्यांत आलें आहे. या विभागांतील अनेक ग्रंथ ग्रंथालयाचे चालकांनीं लोकोपकारार्थ छापून काढिलें आहेत.

तामिऴ् विभागांतील ग्रंथांपैकी विज्ञान आणि वैद्यकशास्त्र संबंधीक ग्रंथ हे अत्यंत महत्त्वाचे होय. त्यांतल्या त्यांत रसायनशास्त्र आणि शरफोजींचा वैद्यकशास्त्र ग्रंथ फारच श्रेष्ठ असें मानिले जातात. त्यांच्या त्या वैद्यकशास्त्र ग्रंथांना "शरभेंद्र वैद्य मुरै" असें नांव आहे.

शरफोजींचा वैद्यकशास्त्र ग्रंथ अठरा खंडांचा आहे. तंजावरांत राजे शरफोजी यांनीं धन्वंतरी महाल नामक एक संस्था स्थापून, त्यांत आयुर्वेद, युनानी, सिद्ध, तसेंच विदेशी अशा वैद्य निपुणांस नेमून, त्यांच्या मदतीनें औषधींची परिशोधना करून, आपल्या अनुभवानें ज्या औषधांच्या प्रयोगानें रोगी स्वस्थ झाला तसलीं औषधें तयार करण्याच्या पद्धती अठरा खंडांत विभागून लिहून ठेविल्या आहेत. यांत गुल्म, क्षय, श्वास रोग, मूत्ररोग, व्रणचिकित्सा, ज्वर, नेत्र रोग, वातरोग वगैरे रोगांवर प्रतीकार करणाऱ्या औषधी तयार कशा कराव्या हे विधि त्या ग्रंथांतून सांगितलें आहेत. सरस्वती महालाचें चालकांनीं छापून काढलेले शरभेंद्र वैद्य ग्रंथ फारच उपयोगी असून हल्लींचे वैद्यलोक हा एक वरप्रसादच असें मानितात.

मोडी लिपी

या ग्रंथालयाच्या नैऋत्य कोपऱ्यांत पाहा. कागदी गठ्ठे भरलेले आहेत. त्यांतें लिहिलेलीं अक्षरें अगदीं विनोदी दिसतात. ह्यालाच मोडी लिपी म्हणतात. मराठे राजे आपल्या राज्यकारभारांत हीच लिपी वापरीत होते. मराठवाड्यांत ही लिपी अजून प्रचलित आहे. आणि तंजवरांतहीं कांहीं कुटुंबांत ही लिपी उपयोगांत आहे. पण हल्ली मद्रास प्रांतांत मोडी जाणणारे फार क्वचितच आढळतील.

संस्कृत पोथ्या

चला! आतां संस्कृत विभाग बघूं. आतांपर्यंत आम्ही पाहिलेल्या विभागांत हाच सर्वांत मोठा विभाग! यांत सर्वशास्त्र संबंधीक ग्रंथ अगणित आहेत. म्हणूनच जगांतल्या हस्तलिखित प्रती सांठवून ठेवलेल्या ग्रंथालयांमध्यें सरस्वती महालास अग्रस्थान मिळालें आहे.

सरस्वती महालाचें नांवलौकीक वाढायाला कारण येथें जमवून ठेविलेले असंख्य संस्कृत ग्रंथ म्हणून निश्चयानें सांगतां येईल. या विभागांत मंत्रशास्त्र, चारीवेद, यांला लागून असणारे वाङ्मय, अतिसूक्ष्म ज्ञानदायक तत्व विचारात्मक वाङ्मय, वैद्यक, संगीत, विज्ञान, नाट्य इत्यादी शास्त्रीय वाङ्मय, सर्वहीं फारच वाखाणण्यासारखें आहेत. नायक व मराठे राजे, त्यांचे दरबारचे विद्वान लोक, गोविन्द दीक्षित, त्र्यंबकरायमखि अशा सारखे पण्डित लोकच वरील ग्रंथाचे कर्ते होत. विज्ञान, वैद्यक या विषयावर संशोधन करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना या ग्रंथालयांत पुष्कळ साधनें मिळतील. उदाहरणार्थ येथें एक सविस्तर रसायन शास्त्र ग्रंथ आहे. त्यांत परमाणु विषयीं व त्यांतील धातु कस कसे बदलावें हे विषय सर्व खुलासेवार दिले आहेत. संशोधकांनां हें संशोधन करून त्याचें फल हिन्द देशाला मिळविणें हें त्यांचें मुख्य कर्तव्य असें समजलें पाहिजें.

चित्रमय शास्त्रीय वाङ्मय

अश्वशास्त्र व गजशास्त्रः — या संस्कृत विभागांतच अश्वशास्त्र व गजशास्त्र आहेत. यांतील चित्रें मनोरंजक आहेत. आणि सूक्ष्मदर्शक आरशाच्या साहाय्यानेंच पाहतां येईल. अशा अति सूक्ष्म अक्षरांनें लिहिलेल्या अनेक प्रतिही आहेत. सरस्वती महालास येणारे प्रवासी लोक हें पाहून आश्चर्य चकित होतात.

अश्वशास्त्र व गजशास्त्र हे दोन्ही ग्रंथ, निरनिराळ्या जातीचे अश्व व गजांचे गुणवर्णन करणारे ग्रंथ होय. जगांत पहिल्यानें घोडे व हत्तींचे जन्म कस कसे झाले, त्यांचे शरीरबांधा पालन करावयाचे तऱ्हा, त्यांना होणाऱ्या दुःखांपासून मुक्त करण्याचें उपाय, इत्यादी विषय या



हत्ती धरावयाचे गेह

दोन्ही ग्रंथांत समावले आहेत. या गजशास्त्राच्या आधारावर 'मातंग लीला' अथवा 'हिन्दूंचा गजशास्त्र' असा एक ग्रंथ एका अमेरिकन् ग्रंथकर्त्यांनें लिहिला आहे. सरस्वती महालाचे चालकांनीं नुकतेंच रंगीत चित्रांसह हे दोन्ही ग्रंथ छापून प्रसिद्ध केले आहेत.

या ग्रंथांत पंख असलेले घोडे व हत्ती आम्ही पाहतों. पशूंना पंख आहेत असें पुराणांत म्हटलें आहे असा समज आहे. पण थोर थोर जनावरांस सृष्टीच्या वेळीं पंखें असून कालांतरानें उत्क्रांतिमुळें ते पंख गळून गेलें असावेंत असें विज्ञानी लोक म्हणतात. त्याच प्रमाणें गजशास्त्र ग्रंथांत काहिं चित्रांतून दोन व तीन जोड सुळ्याचे गज दिसत आहेत. कांहीं



दोन व तीन जोड सुळ्यांचे हत्ती.



राजाचा-घोडा

उपरंध्रावर आवर्त

स्रीजनांच्या चित्रांकडून झालेल्या अश्वावर रति

वर्षांमागें आफ्रिका खंडांत कांगोप्रदेशांत दोन जोड सुळ्याचें हत्ति मारले गेल्याचें विदित असेलंच. यावरून या ग्रंथांतले चित्रें काहीं काल्पनीक नव्हेत हें आम्हास पटलें पाहिजे.



मागें कांहीं अतिसूक्ष्म अक्षराविषयीं उल्लेख केला होता ना! हे पहा! यांत एक एक अक्षर अगणित अतिसूक्ष्म अक्षरांनीं गोंवून काढलें आहे. तीक्ष्ण दृष्टीच्या लोकांनांहीं सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानेंच ही अक्षरें ओळखतां येईल. हे पाहिल्याबरोबर आमचें मन त्या ग्रंथकर्त्याकडे माच्छर्यानें पाहतें. नाहीं का!

हेंच ते रुग्वेद गट्ट. पाहिलांत! लेखन कितिसुन्दर आहे! मुख पत्रावरील चित्रें पाहून डोळे दिपून जातात. प्रत्येक ऋचेचा गुह्यार्थ ही चित्रें आम्हाला सुचवितात. या संस्कृत विभागांतील हर एक ग्रंथाचा उत्कृष्ट सांगणें हे काहीं सोप होणार नाहीं. या संस्कृत विभागांतले ग्रंथांची यादी वीस भाग आहेत. म्हणूनच या विभागाचे महत्व थोडक्यांत सांगणं ही कठिण जाते.

दक्षिण हिन्दुस्थानचें ऐतिहासिक महत्वाचे साधनें

ह्या ग्रंथालयांत संशोधन करूं इच्छिणाऱ्या संशोधकांस अत्यंत उपयुक्त होतील असें हस्तलिखित कागदी पोथ्या, दुर्मिळ पुस्तकें, इत्यादि साधनें पुष्कळ आहेत. हे सगळें छापून काढण्यांत आले नाहीत. यांच्या साहाय्यानें भारताचा इतिहास नूतन पद्धतीनें लिहितां येईल. विशेषें करून इ. स. १७३० नंतर अंदाजे ५० वर्षपर्यंत दक्षिण भारतांत घडलेली कांहीं मुख्य धटनेंचा ऐतिहासिक विवेचन या ग्रंथांत केली आहे. तेंव्हा तंजावरांत प्रतापसिंह राजे, तुळजाराजे यांनीच राज्य करीतहोते. यांच्या कारकीर्दीतच ईस्ट् इंडिया कंपनीने आपली व्यापारी धंदा सोडून राज्य चालविणेचा अधिकार पत्करले. पेशव्यांचा अधिपत्याखाली मराठे चाल करूं लागले. हैदर अली, टिप्पुसुलतान यांचा हल्ला कमी नव्हता. आणि तंजावर संस्थान व कर्नाटकनवाब यांच्या मध्ये तंटे भांडण सुरू झाले. या सर्वांना तंजावर एक केन्द्रस्थान बनलें. आंग्रज

व भारताचे राजे एकत्र होऊन फ्रेंच लोकांबरोबर दिलेल्या लढायांत तंजावराचा संबंध नाहीं असा उल्लेख ह्या ग्रंथांमध्ये कुठेहीं दिसत नाहीं. वरील हकीकत, इतिहास संशोधकांना भारताचा इतिहास जसेच्या तसें नवीन तयार करण्यास, विस्मरण पावलेले रण धुरंदर राजे रजवाडे यांचे कीर्ती कायम राखण्यास, आणि अन्यायानें निन्दोक्तीस पात्र झालेले लोकांचे कीर्ती गाजविण्यास अत्यंत उपयोगी पडेल.

आतां एकवेळ सरस्वतीमहाल फिरून पाहिल्यानंतर थोडा वेळ उभे राहून योजिलें तर, इतुक्या सुन्दर व नांवाजलेले संस्थेला कारणीभूत जे राजे शरफोजी यांचा आकार आमच्या नजरेसमोर आल्याशिवाय राहत नाहीं. किती त्यांचा शौर्य! युद्धरंगांतमात्र नव्हे! तर कला कौशल्य, विद्यावैभव, इत्यादी विषयांतहीं त्यांनी एक्या हिरापरी चमकत असे. राजे शरफोजी यांनी आपले राज्य आंग्रजांकडे सोपवून कलाभुवनांत आपला झेंडा फडकाविला. कलाभुवनांत विजयश्री मिळविलेले राजे शरफोजींचे अमरकीर्तीचे चिन्ह म्हणून ही सरस्वती महाल आज प्रख्यात आहे.

राजे शरफोजी यांच्या चित्तांत महत्वाचे घटना कितितरी थरले होते! आतांपर्यंत आम्ही पाहिलेले तऱ्हे तऱ्हेचे वाङ्मय सर्वहीं, शरफोजीराजांची बुद्धिमत्ता व कल्पनाशक्ति किती अवाढव्य होती म्हणायाचें आम्हाला कळवूं शकतात. संगीतासारिखें सूक्ष्म कलामात्र नव्हे, तर विज्ञान, वैद्यक इत्यादी विषयांतहीं बारीक अशा दृष्टीनें निरखण्यांत ते पटायीत होते. १८ खंडाचे वैद्यक ग्रंथावरून आरोग्यशास्त्रांत त्यांचा श्रद्धा किती होतें हे आम्हला उघड कळूं येतें. राजे, आपल्या राज्यांत विद्येचा प्रचारकरण्यांत फार तत्पर असत. आपल्या संस्थानांत पाश्चिमात्य विद्येसाठी एक शाळा आणि स्वदेशीय कलाभिवृद्धिसाठी एक शाळा अशी दोनी शाळाकाढून त्या शाळेंत मुलें सर्वहीं शिक्षण घेण्याची तजवीजहीं केली होतीं. मुलांसाठी म्हणून आपण स्वतः शाळेयपुस्तकीहीं रचिली. आणि ते पुस्तकी छापून काढण्याच्या हेतूनें पहिल्यानेंच तंजावरांत एक छापखाना काढून, दगडी छापहीं तयार केले. ही दगडी छपाइचे पुस्तकें अजूनहीं येथें पाहावयास मिळतात. राजे सबंद हिन्दुस्थान प्रवास करून आपल्या राज्याला व प्रजांना कल्याणकारक असें अनेक वस्तु मिळविले आहेत. इ. स. १८२६ त बिषप् हीबर नांवाच्या पादिरीनें तंजावरला येऊन, राजांचे पाहुणे म्हणून कांहीं दिवस राजवाड्यांत राहिले होते. त्यांनी आपण पाहिलेले राजेलोकांपैकीं राजेलोकांस शोभणारी सर्वगुण व चालीरीती शरफोजी राजाकडेंच आहे असें आपल्या रोजनिशींत नोंदवून ठेविले आहेत. चालीरीती मात्र

नव्हे तर त्यांची विशाल बुद्धि, वेदाधर्मांत श्रद्धा, हे शरफोजीस पाहणारांचे मन आकर्षित करतें. कां! आज आम्ही, ह्या थोर विभूतीच्या परिश्रमाचे फळें अनुभवण्यांत, आनंदसागरांत डुबत नाहीं काय? राजे शरफोजीविषयीं तंजावरांत अनेक कथा प्रचलित आहेत. पण ते सर्व त्यांच्या विद्याभ्यासंगाचेच आहेत. उदाहरणार्थ त्यांच्या ह्यातींत एके दिवसी एक्या विद्वानानें कांहीं ग्रंथ विक्रीसाठीं म्हणून राजांकडे आणिलें. त्या वेळीं शरफोजीपासी पुरेल तितुकें द्रव्य नव्हता. म्हणून लगेच कां कूं नकरता राजे आपल्या गळ्यांतील एक मोल्यवान् कण्ठाभरण काढून त्या विद्वानाच्या हवालीं केलें आणि ग्रंथ घेतले. तो विद्वानहीं संतुष्ट होवून राजांची परवानगी घेवून निघून गेला. असें एक ना दोन अगणित द्रव्य देऊन, अमोलिक ग्रंथ विकत घेवून सांठवून ठेवल्यामुळेंच, हे सरस्वतीमहाल ग्रंथालयास, आज जगांतच अग्रस्थान लाभलें आहे. म्हणूनच ह्या ग्रंथालयाला "राजे शरफोजी यांचे सरस्वती महाल ग्रंथालय" म्हणणें फारच उचित आहे. ह्या भूतलावर अमरकीर्ति गाजविणारी सरस्वती महाल ग्रंथालयासारिखें अमोल्य खाण ठाकून जाणारें राजे दुसरे कुणीच नाहीं म्हटले तरी चालेल.

तंजावरांत मराठे राजांचे कारकीर्द मावळल्यानंतरहीं सेवट शिवाजीराजे यांचे चे संततीनी ह्या संस्थेची व्यवस्था चांगल्या रीतीनेंच ठेविली होती. तरी पण कालांतरानें आपला हक्क सोडून सामान्य जनतेच्या हातीं यावें असें वाटल्यानें इ. स. १९१८ मधें गवर्न्मण्टद्वारा पञ्च नेमून सरस्वती महाल ग्रंथालय त्या निवडक मंडळाकडे सोंपविले. त्यावेळी राजकुटुम्बामधे आपसांत कांहीं भानगड सुरू होऊन, इस्टेटीची वांटणीसाठीं न्यायालयांत खटला चालू असूनहीं, ह्या ग्रंथालयाचे बाबतींत दोन्ही पक्षाचे एकोपा होऊन, ग्रंथालयाचा वांटणी न करतां पञ्च नेमून, त्यांच्या हवालीं ग्रंथालय सोंपावें म्हणून विनवणी केल्यावर, न्यायाधीशानी सरस्वती महाल एक सार्वजनिक ठेव असे मानून; त्यांनी देणगी दिलेले एक लक्ष रुपये ग्रंथालयाच्या निर्वाहासाठीं मूलधन म्हणून ठेऊन, मद्रास सरकारानी नेमलेल्या पंञ्चाच्या हवालीं केले. त्या दिवसापासून निवडक मंडळानें ग्रंथालयाचा निर्वाह चालवीत आहे. दिवसेंदिवस ग्रंथालय वृद्धिंगत पावल्यामुळें त्या देणगींतून मिळणारी उत्पन्न पुरेनासि झाली. त्यामुळे मद्रास सरकारच्या द्रव्य सहाय्य घेऊन इ. स. १९३० ते १९३६ पर्यंतच्या अवधींत सरस्वती महालांतील, संस्कृत, आंध्र, मराठी, तामिळ् या चारी भाषेतील ग्रंथांची बयाजवार यादी तयार करून प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. इ. स. १९४७ मधे भारतावर स्वातंत्र्याचें उदय होतांच, ह्या ग्रंथालयाचें प्रकाश चोहीं बाजूला पसरलें. तेंव्हा मद्रास सरकारनी ह्याचे महत्व जाणून, सरस्वती महालाचा निर्वाह चांगला व्हावा, आणि त्यांतील लोककल्याणोपयोगी सारे ग्रंथहीं छापून प्रसिद्ध करावें

म्हणून दरवर्षी दांडगा रकमाचा देणगी देण्यास सुरुवात केले आहेत. ग्रंथालयाचे निर्वाहक मंडळींहीं तेव्हांपासून आतां पर्यंत सार्वजनिक उपयोगांसाठी म्हणून अनेक ग्रंथ छापून प्रसिद्ध केले आहेत. पण अजून अगणित दुर्मिळ अपूर्व ग्रंथ छापावयाचें आहेत. हे काम पुरी करण्यास सरस्वती महाल चालकांनी, मद्रास सरकार व मध्य सरकार ह्यांची द्रव्य सहाय्य आदरावर अवलंबून आहेत.

सरस्वती महालाचे संशोधकवर्ग

तंजावर चा इतिहास

चोळराजे—करिकाल चोळन्

ऐतिहासिक पुराव्यावरूनें तंजावरचा पहिला राजा 'करिकाल चोळन्' असें कळून येतें. इ. स. ५० ते ९५ पर्यंत त्यांचा कारकीर्द चालू होता. हे चोळराजे महापराक्रमी व राजतंत्री होते. तंजावराच्या पूर्व दिशेस १५ मैलच्या अंतरावर कोइलवनी असें एक गांव आहे. तेथें करिकालन् यांनी चेर पाण्ड्य सैन्यांचा पाडाव केलें आहे. कावेरी नदीला मोठा असा एक बंधारा बांधून वैश्यजनांच्या सोयीसाठी कावेरिप्पूंपट्टिणम् ह्या ठिकाणीं एक बंदर बनविले आहेत. करिकालनाच्या कारकीर्दींत उद्योग धंदे आणि व्यापार कसकसे वृद्धि पावले म्हणायाचें, त्यावेळचीं 'पट्टिणप्पालै' ग्रंथांतून कळून येतें. दुसरा एक श्रेष्ठ ग्रंथ 'शिलप्पदि-कारम्' होय. करिकालन् यांनें उत्तर देशावर स्वारी करून, तेथील मगध, अवती वगैरे देशांचे राजेलोकांचा पराभव कसें केलें हे या ग्रंथांत सविस्तर वर्णिलें आहे.

करिकालन् व त्यांचे वंशीयराजे शंगम्कालाचे राजे म्हणून पुकारले जातात. त्या कालांत अनेक तामिल् ग्रंथ फार प्रसिद्धी पावली होती.

विजयालय चोळन्

इ. स. ५ व्या शतकांत पल्लव राजांकडून चोळराजांचा पराजय झाला. आणि नवव्या शतकापर्यंत चोळराजे माण्डलीक बनले गेले. पण इ. स. नवव्या शतकांत विजयालय चोळन् ह्यांनी पल्लवांच्या कचाट्यांतून सुटून स्वतंत्र राज्य स्थापून इ. स. ८५० ते ८७१ तागाइत राज्यकारभार चालविलें. मुत्तरैयरांकडून तंजावर हस्तगत केल्याचें यश विजयालयलाच मिळालें आहे. तंजावरांत चोळराज्य स्थापना केलेले पहिले राजे विजयालयन् होय.

आदित्य चोळन्

विजयालयनाचे चिरंजीव आदित्य चोळन् हे महान् पराक्रमी होते. श्रीपुरम्बियम ह्या ठिकाणी झालेला चोळ व पाण्ड्य राजांच्या लढाईत आदित्यचोळन् विजयश्री मिळविली. ह्या लढाई नंतर पाण्डयराजे सुधारावयास फार दिवस लागलें. आदित्यचोळानंतर त्यांचे पुत्र पहिले परांतकन् ह्यांनी इ. स. ९०७ त सिंहासनारूढ होऊन इ. स. ९५३ पर्यंत राज्य चालविले.

इ. स. ९५३ पासून ९८५ तागाइत पुनः चोळराज्य खालावत गेली. पण कांहीं वर्षांनी आणखी एक चोळराजा प्रख्यात झाला व चोळराज्य पुनः झळकूं लागलें.

राजराज चोळन्

तामिळ् देशांत राजराज चोळन्‌चि माहिती नसेल असा मनुष्य विरळाच सांपडेल. राजराज चोळन् आपल्या भुजबल पराक्रमानें सबंद दक्षिण हिन्दुस्थान म्हणजें मद्रास प्रांत, म्हैसूरचा कांहीं भाग व सिलोन् बेट ह्या सगळ्यावर आपला सत्ता गाजवीत होते. ह्यांच्या कारकीर्दिंत व्यापार, विद्या, उद्योगधंदे वगैरे फारच प्रबळ होते. ह्या राजांचे नाविक सैन्य मलाया, इन्डोचैना, बर्मा इत्यादी देशांबरोबर लढून, विजयश्री मिळवून त्या सगळ्या देशांत राजराज चोळन्‌च्या झेंडा फडकाविला गेला.

राजराजन् ह्यांनी आपल्या राज्यांतले शिल्पकला निपुणांच्या साहाय्यानें तंजावरांत एक भला मोठा देऊळ बांधवून त्यांत बृहदीश्वराचें प्रतिष्ठा केला आहे. हे ह्यांच्या जीवनांतील एक महत्कृत्य होय.

राजेन्द्रचोळन्

राजराजन् इ. स. ९८५ ते १०१४ पावेतो राज्य करून निधन पावले. ह्यांचा मुलगा राजेन्द्रचोळन् यांने इ.स. १०१२ ते १०४४ पर्यंत राज्य कारभार चालविले. हे राजेहीं आपल्या पित्याप्रमाणें मोठे शूर व पराक्रमी होते. समुद्रापलीकडचे देशावर स्वाऱ्या करून अनेक राज्य राजेन्द्रचोळानें आपल्या ताब्यांत आणिले. ह्यांच्या मुलांचे व नातवंडांचे वेळीहीं तंजावर संस्थान समुद्रापलीकडें फांपावली गेली होती. ह्यांचे राज्य उत्तर हिन्दुस्थानांत गंगानदीपर्यंत पसरलें होतें. म्हणून राजेन्द्राला "गंगेकोण्डान्" असें ओळखण्यांत येई. तंजावर जिल्ह्याचा वेशीबाहेर पूर्वदिशेस एक नवीन राजधानी निर्माण करून, त्याला 'गंगैकोण्डचोळपुरम्' असें नांवहीं दिलें. मलायाप्रांत जिंकल्याचें स्मरणार्थ तंजावर, तिरुच्चिराप्पळ्ळीच्या कांहीं भागास 'कडारम्‌कोण्डान्' असें नांव दिलें. हे नांव देण्याचें कारण इतुकेंच कीं त्या वेळी मलायास 'कडारम्' म्हणत.

राजेन्द्राचें संतति

राजेन्द्रानंतर राजाधिराजन्, राजेन्द्रदेवन्, व वीरराघवन् असें तिघे गादीस आले.

ह्या सर्वांच्या कारकीर्दींतहीं नाविक दळ, अनेक लढाया जिंकून चोळराजांचे हक्क मलाया, बर्मा सिलोन् बेट वगैरे देशांवर सुस्थिर केलें.

पहिले कुलोत्तुंगन्

इ. स. १०७० त पौर्वात्य चालुक्य व चोळांचे तहाप्रमाणें पहिले कुलोत्तुंगन् चोळराज्याचे अधिकार पत्करले. ह्यांनी भला मोठा राज्यावर आपली सत्ता गाजवून, चीन, कडारम्, सुमात्रा इत्यादी देशांत आपला वकीलात ठेविले होते. ह्यांचे पुत्र विक्रम चोळन्, नातु दुसरा कुलोत्तुंगम् ह्यांनीहीं आपापल्या प्रख्यात विजयामुळें इ. स. ११५० पर्यंत चोळराज्याची ख्याती कायम् राखिले. इ. स. १२७९ त तिसरे राजेन्द्र चोळन् दिवंगत झाले. तो पर्यंत तंजावर राज्य चोळांच्या हातीच होता.

चोळराजे भुजबलपराक्रमानें व राज्य कमविण्यांत जसें पटाईत होते, तसेंच विद्या, कलाचार इत्यादींच्या उत्तेजग्यांनहीं हुषार असून विद्वान् लोकांचा आदर सत्कार बहुपरी करीत होते. म्हणूनच सरस्वती महालांतले सर्व जुनी ग्रंथ आज या वीसाव्या शतकांतहीं अतिश्रेष्ठ दर्जाचें आहे असें सर्व लोक मानतात.

नायकराजे

दक्षिण देशांत चौदाव्या शतकाच्या शेवट पर्यंत अनेक राजे, आपण चोळवंशीय राजे म्हणवून घेऊन, राज्य चालवीत आले. तेव्हां विजयानगरचे राजे तंजावर आपल्या ताब्यांत घेतले होते. आणि त्यांनी, आपण नेमलेल्या प्रतिनिधीद्वारा तंजावरांत राज्य करीत असत. इ. सन्. १५३२ त विजयानगरचे राजे अच्च्युतप्पा ह्यांनी तंजावरच्या राज्यावर आपले प्रतिनिधी म्हणून, सेवप्प नायक म्हणणारांस नेमिले. ते सेवप्पनायकच तंजावरावर राज्य चालविलेले नायकवंशस्थ राजांचे मूळपुरुष होय.

सेवप्पनायक

इ. सन्. १५६० पर्यंत तंजावर राज्य चालविलेले सेवप्पनायक, शिल्पामधे पारंगत असून. ते आस्थेवायिक हीं होते. तितुकेंच नव्हे . ते नावांजलेले कलाभिमानी होते आणि साऱ्या मतांकडे समदृष्टी देत. त्यामुळें मुसल्मान, ख्रिस्त, बौद्ध इत्यादी लोक ह्यांचे अत्यंत स्नेही बनले गेले. ह्यांनीही मतद्वेष न धरितां, सर्वांना सारखें समजून प्रजाजनांचा सुखावहा कडे लक्षलाविले. ह्यांच्या कारकीर्दीतच नागप्पट्टिणम् येथें, पोर्तुगीसांनी येऊन वसती करूं

4

लागले. ह्यांना उत्कृष्ट योचना सांगावंयास गोविंद दीक्षित नांवाचे एक चतुर मंत्री होते. ते गोविंद दीक्षित सेवप्पाचा पुत्र अच्च्युतप्प नायक, नातु रघुनाथ नायक ह्यांच्या कडेहीं मंत्री म्हणून होते.

अच्युतप्पनायकः

हे इ. स. १५६० ते १६०० पर्यंत राज्यभार केले. हे असामान्य विद्वान असल्यानें, कोणतेंहीं विषय बारकायीनें पाहून अति लौकर निर्णय करण्याची शक्ति त्यांच्या आंगी होती. त्यांना मुसल्मान आणि पोर्तुगीस् ह्या लोकांबरोबर लढणें भागपडलें सिलोन् बेटाचे अधिकारी वर्ग पोर्तुगीस् ह्यांनी, जाफना राजासी लढून जाफ्नाराजाला पदच्युत केले. त्या पदच्युत झालेला जाफ्नाराजाला अच्च्युतप्प नायकांनी आश्रय दिला.

रघुनाथनायक

